ePaper
दसरा मेळाव्यात भाषणासाठी मोर्चेबांधणी; दोन्ही गटातील प्रमुख नेत्यांमध्ये चढाओढ!




| वर्ष - 6 | अंक - 171 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

नवरात्रौत्सव
आजचा रंग
मोरपंखी



www.mahaenews.com | सोमवार | दिनांक 3 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## चांदणी चौकातील पूल

# अखेर जमीनदोस्त!

## मध्यरात्री स्फोट : वाहतूक सुरळीत करण्याची लगबग



| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेला मुंबई-बंगळुरू महामार्गावरील चांदणी चौकातील उड्डाणपूल अखेर शनिवारी मध्यरात्रीनंतर एक वाजता मर्यादित स्फोट घडवून काही क्षणांतच जमीनदोस्त करण्यात आला. पूल पाडण्यासाठी गेल्या दोन आठवड्यांपासून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, पोलीस आणि तांत्रिक पथकाकाडून मोठ्या यंत्रणेच्या माध्यमातून तयारी करण्यात येत होती. पाडलेल्या पुलाचा राडारोडा हटिवण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले असून, राडारोडा उचलण्याचे काम पूर्ण होईपर्यंत या भागातील वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. चांदणी चौक आणि परिसरात सकाळी आठवाजेपर्यंत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. स्फोट घडवून पाडण्यात आलेला पुण्यातील हा पहिलाच पूल असल्याने नागरिकांमध्येही त्याबाबत प्रचंड उत्सुकता होती.**

महामार्गावरील चांदणी चौकात होणारी सातत्याने वाहतूक कोंडी सोडण्याच्या दृष्टीने पूल पाडण्याचा निर्णय घेण्यात आला होता. कमी वेळेत पूल पाडून त्याचा राडारोडा जमा करणे आणि वाहतूक कमी वेळेत पूर्ववत करण्यासाठी पूल स्फोटकाने पाडण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार कोची आणि नोएडा येथील जुळे मनोरे पाडणाऱ्या कंपनीलाच हा पूल पाडण्याचे काम देण्यात आले. याच कंपनीने पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील अमृतांजन पूल पाडण्याचे काम केले आहे. कंपनीच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांनी सुरुवातीला पुलाची आणि परिसराची पाहणी केली. त्यानंतर स्फोटके भरण्यासाठी छिद्रे पाडण्यात आली. त्यानंतर गेल्या चार ते पाच दिवसांपासून विविध तांत्रिक कामे पूर्ण करण्यात आली. त्यापूर्वी शुक्रवारी केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी या परिसराची हवाई पाहणी केली.

पूल पाडण्यासाठी सुमारे सहाशे किलो स्फोटकांचा वापर करण्यात आला. तांत्रिक रचनेनुसार घेतलेल्या १५०० हजार छिद्रांमध्ये ही स्फोटके भरण्यात आली होती.

शनिवारी सकाळपासून तांत्रिक पथकाकडून पूल पाडण्याच्या कामाची अंतिम तयारी करण्यात येत होती. शनिवारी रात्री सातारा आणि मुंबईकडून येणारी वाहतूक टप्प्याटप्प्याने थांबविण्यात आली. मुंबईकडून येणाऱ्या वाहतुकीतील हलकी वाहने तळेगाव येथूनच पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. रात्री उशिरा चांदणी चौकाच्या परिसरातील सर्व भाग निर्मनुष्य करण्यात आला. स्फोटाच्या परिसरात ठरावीक जबाबदार अधिकारी आणि तांत्रिक पथकाचीच उपस्थिती होती. तांत्रिक पथकाला सूचना मिळताच केवळ काही सेकंदाच्या अंतराने दोन स्फोट घडवून पूल पाडण्यात आला.

### ...असा पाडला पूल

चांदणी चौक येथील पूल पाडण्यासाठी प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली होती. १ हजार ३५० डिटोनेटरच्या सहाय्याने नियंत्रित स्फोटाद्वारे पूल पाडण्यात आला. पूल पाडण्यासाठी आणि मार्ग मोकळा करण्यासाठी १६ एक्स्कॅव्हेटर, चार डोझर, चार जेसीबी, ३० टिप्पर, दोन ड्रिलींग मशीन, २ अग्निशमन वाहन, ३ रुग्णवाहिका, २ पाण्याचे टँकर वापरण्यात येत आहेत. पूल पाडण्यापासून रस्ता मोकळा करेपर्यंत साधारण २१० कर्मचारी एनएचएआयतर्फे नियुक्त करण्यात आले आहेत. पूल पाडण्यासाठी त्याला दीड ते दोन मीटर लांबीचे आणि साधारण ३५ मिमी व्यासाचे १ हजार ३०० छिद्र पाडण्यात आले होते. त्यात ६०० किलो इमल्शन स्फोटकांचा उपयोग करण्यात आला. १ हजार ३५० डिटोनेटरच्या वापरातून हा नियंत्रित स्फोट करण्यात आला. पूल पाडताना त्याचे तुकडे अथवा धूळ परिसरात उडू नये यासाठी ६ हजार ५०० मीटर चॅनल लिंक्स, ७ हजार ५०० वर्ग मीटर जिओ टेक्स्टाईल, ५०० वाळूच्या पिशव्या आणि ८०० वर्ग मीटर रबरी मॅटचा वापर आच्छादनासाठी करण्यात आला होता.

### प्रवेशासाठी प्रतिबंध..

पूल पाडण्यासाठी रात्री आठपासूनच शेवटची तांत्रिक कामे सुरू करण्यात आली होती. स्फोटानंतर राडाराडा बाहेर उडू नये, यासाठी संपूर्ण पुलाला अच्छादित करण्यात आले. आतील भागामध्ये स्फोटाची तीव्रता कमी करण्यासाठी वाळूच्या गोण्या आणि स्पंचचा वापर करण्यात आला. रात्री अकराच्या सुमारास या भागातील सर्व वाहतूक बंद करण्यात आली. त्याचप्रमाणे परिसरातून सर्व नागरिकांना बाहेर काढण्यात आले. पूल पाडण्याच्या कामात प्रत्यक्षात सहभागी असणाऱ्या मोजक्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना वगळता या भागात कोणालाही प्रवेश देण्यात आला नाही. रात्री बाराच्या सुमारास स्फोटकांच्या वाहिन्या मुख्य सर्किटला जोडण्याचे काम पूर्ण करण्यात आले. पूल पडण्याच्या शेवटच्या टप्प्यात सुमारे ४०० पोलीस कर्मचाऱ्यांनी संपूर्ण परिसर पिंजून काढत सर्वांना बाहेर काढले. त्यासाठी ड्रोन कॅमेऱ्यांचीही मदत घेण्यात आली. शेवटी दहा आकड्यांची उलटी गणना सुरू करण्यात आली आणि दहापासून ऐक म्हणताच काही सेकंदातच १९९२ मध्ये बांधलेला ३० मीटरचा हा पूल इतिहासजमा झाला. संपूर्ण पूल जमीनदोस्त होण्यास मात्र काही कालावधी लागला.

## शॉर्ट न्यूज

### चांदणी चौकातील वाहतूक ११ तासांनी पूर्ववत

।पुणे। महाईन्यूज ।

चांदणी चौकातील पूल स्फोटकांनी पाडण्यात आल्यानंतर अकरा तासांनी बाह्यवळण मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली. चांदणी चौकातील पूल स्फोटकांनी पाडण्यात आल्यानंतर अकरा तासांनी बाह्यवळण मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली. सकाळी दहाच्या सुमारास या भागातील वाहतूक पूर्ववत झाली.मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरील जुना पूल मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास स्फोट घडवून पाडण्यात आला. पूल पाडण्यासाठी ६०० किलो स्फोटकांचा वापर करण्यात आला. शनिवारी (१ ऑक्टोबर) बाह्यवळण मार्गावरील वाहतुकीत बदल करण्यात आला. या भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. रात्रीपासून या भागात पोलिसांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले होते. रात्री दहानंतर या भागातील वाहतूक थांबविण्यात आली. मध्यरात्री एक वाजून एक मिनिटांनी स्फोटकांचा वापर करुन पूल पाडण्यात आला. त्यानंतर या भागातील राडारोडा काढण्यास सुरूवात करण्यात आली. रविवारी सकाळी आठ वाजेपर्यंत राडारोडा हटवून बाह्यवळण मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते.

# दसऱ्यानिमित्त मार्केट यार्डात फूल महोत्सव!

## शेतकऱ्यांना फूल विक्रीसाठी नि:शुल्क जागा उपलब्ध

।पुणे (आंबेठाण)। महाईन्यूज।

**पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीकडून दसऱ्यानिमित्त फूल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना फूल विक्रीसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून कोणतेही शुल्क न आकारता जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या दसऱ्यासाठी फुलांना मोठी मागणी असते. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील फळ आणि भाजीपाला विभागाच्या समोरील शेतीमाल वाहतूक करणाऱ्या गाड्या लावल्या जातात.**



तेथील जागा फूल विक्रेत्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहे, अशी माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांनी दिली. या वेळी भाजीपाला विभागाचे प्रमुख बाबासाहेब बिबवे उपस्थित होते. या जागेवर शेतकरी नसलेली व्यक्ती फूल विक्री करु शकते. मात्र, त्यांच्याकडून दिवसाला एक हजार रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. बाजारातील अडते फूल विक्री करु शकतात. त्यांना नियमाप्रमाणे बाजार कर (सेस) भरावा लागणार आहे. दसऱ्याला झेंडू, शेवंतीसह विविध प्रकारच्या फुलांना मागणी असते. दरवर्षी शेतकरी मार्केट यार्डातील शिवनेरी रस्ता, भुसार बाजार परिसरात गाड्या लावून फुलांची विक्री करतात. शिवनेरी रस्त्यावर कोंडी होत असल्याने बाजार समितीने फूल विक्रीसाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे. ठरवून दिलेल्या ठिकाणी फूल विक्रीस परवागनी देण्यात आली आहे. मार्केट यार्डातील फूल बाजारातील व्यापारी दरवर्षी प्रमाणे व्यापार करणार आहेत, असे त्यांनी नमूद केले. बाजार समितीच्या आवारातील प्रवेशद्वार क्रमांक सातजवळ गुरांचा बाजार आहे. तेथील जागेत आंब्याच्या हंगामात तात्पुरते छत उभे करुन आंबा विक्रीस परवानगी दिली जाते.

यंदा दसऱ्यापर्यंत या जागेत शेतीमालाचे ट्रक लावण्यास मुभा देण्यात आली आहे. तेथे शेतीमाल वाहतूक करणारे ट्रक लावावेत, असे आवाहन बाजार समितीकडून करण्यात आले आहे.

> **“दसऱ्यानिमित्त शेतकऱ्यांना फूल विक्रीसाठी बाजार समितीकडून कोणतेही शुल्क न आकारता जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. मात्र, शेतकऱ्यांनी पिकांची नोंद असलेला सात-बारा उतारा आणि आधारकार्ड देणे बंधनकारक करण्यात आले आहे.**
>
> – **मधुकांत गरड,** प्रशासक, पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती

**श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील फळ आणि भाजीपाला विभागाच्या समोरील शेतीमाल वाहतूक करणाऱ्या गाड्या लावल्या जातात. तेथील जागा फूल विक्रेत्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहे, अशी माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांनी दिली. या वेळी भाजीपाला विभागाचे प्रमुख बाबासाहेब बिबवे उपस्थित होते. या जागेवर शेतकरी नसलेली व्यक्ती फूल विक्री करु शकते. मात्र, त्यांच्याकडून दिवसाला एक हजार रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. बाजारातील अडते फूल विक्री करु शकतात. त्यांना नियमाप्रमाणे बाजार कर (सेस) भरावा लागणार आहे.**

# ओला कचरा जिरवण्यासाठी निधी द्या !

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।





पिंपरी-चिंचवड महापालिकेला सर्व प्रकारचा कर देणाऱ्या शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांना त्यांच्याच आवारात ओला कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची सक्ती करणे योग्य नाही. जागा उपलब्ध असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये महापालिकेने स्वतःचा निधी देऊन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा उभारावी. तसेच २०१६ नंतरच्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये ओला कचरा विल्हेवाटीची यंत्रणा न उभारलेल्या बिल्डरांवर कारवाई करावी. उगाचच कायद्याचा धाक दाखवून गृहनिर्माण सोसायट्यांचा कचराच उचलणार नसल्याचे सांगत लाखो लोकांना घाबरवू नका. महापालिकेने वड्याचे तेल वांग्यावर काढण्याचे धोरण सोडून द्यावे. गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये महापालिकेमार्फत ओला कचरा विल्हेवाटीची यंत्रणा उभारली जात नाही, तोपर्यंत प्रतिदिन १०० किलोहून अधिक ओला कचरा निर्माण करणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्यांचा ओला कचरा न उचलण्याच्या आदेशाला बेमुदत स्थगिती द्यावी, अशी सूचना आमदार लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना केली आहे.

यासंदर्भात आमदार लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, “शहरातील मोठ्या सहकारी गृहनिर्माण संस्थामधील ओला कचरा २ ऑक्टोबरपासून न उचलण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबत महापालिकेने गृहनिर्माण संस्थाना नोटीसा जारी केल्या होत्या. महापालिकेने गृहनिर्माण संस्थांना पाठवलेल्या नोटीसीनुसार प्रतीदिन १०० किलो ओला कचरा निर्माण करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थानी या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी त्यांच्याच आवारात प्रकल्प उभारणे बंधनकारक केले आहे. असा प्रकल्प न उभारल्यास २ ऑक्टोबरपासून संबंधित गृहनिर्माण संस्थांचा कचरा महापालिका उचलणार नाही, अशी भूमिका प्रशासनाने जाहीर केली आहे. आता ही डेडलाईन प्रशासनाने ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढवली आहे.

## आमदार लक्ष्मण जगताप : महापालिकाआयुक्तांना ठणकावले

### सोसायट्यांना व्यवहारीकदृष्या शक्य नाही...

**महापालिकेच्या या तुघलकी निर्णयामुळे केंद्र-राज्य तसेच महापालिकेलाही सर्व प्रकारचे कर देणाऱ्या गृहनिर्माण संस्थामध्ये वास्तव्याला करणाऱ्या लाखो लोकांच्या मनामध्ये महापालिकेच्या कारभाराबाबत मोठ्या प्रमाणावर रोष निर्माण झाला आहे. ओला कचरा उचलणे बंद करण्याचा नियम हा फक्त सहकारी गृहनिर्माण संस्थानाच का?, असा प्रश्न या नागरिकांच्या मनामध्ये निर्माण झाला आहे. एकीकडे पाण्याच्या कमतरतामुळे अनेक सोसायट्यांना टँकरवर अवलंबून रहावे लागते. त्यावर दिवसाला लाखो रुपये या सोसायट्यांना खर्च करावा लागत आहे. त्याचप्रमाणे शहरातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये कचरा प्रकल्पासाठी जागाच उपलब्ध नाही. जागा उपलब्ध असेल आणि एखाद्या सोसायटीने ओला कचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प उभारायचे ठरवले, तर त्यासाठी लागणारा निधी, वीज, पाणी व तज्ज्ञ ऑपरेटरची कमतरता आहे. घन कचरा व्यव्यस्थापन प्रकल्प उभारणे आणि त्याचे व्यवस्थापन करणे गृहनिर्माण सोसायट्यांना व्यावहारिकदृष्ट्या शक्य नाही.**

## आमदार आण्णांचे एकला चालो रे!

# पिंपरीत राष्ट्रवादीचा ‘खेला होबे रे’

### राजकीय चर्चेला उधाण : अजित पवार ‘लक्ष’ घालणार काय?




**पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पश्चिम बंगालमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची ‘खेला होबे रे’ ही प्रचार घोषणा प्रचंड गाजली. भाजपासोबत झालेल्या अटितटीच्या लढतीत एकाकी ममतांनी बाजी मारली. अशीच काहीशी परिस्थिती पिंपरी-चिंचवडमध्ये २०२४ मध्ये पहायला मिळण्याची शक्यता आहे.

पिंपरी विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार अण्णा बनसोडे सध्यस्थितीला राष्ट्रवादीत एकाकी पडल्याचे चित्र आहे. स्थानिक पदाधिकारी आणि नेते कोणत्याही निर्णय प्रक्रियेत विश्वासात घेत नाहीत आणि पक्षश्रेष्ठी किंबहुना राज्याचे विरोधी पक्षनेते आणि ‘कारभारी’ अजित पवारसुद्धा दखल घेत नाहीत, अशी स्थिती आहे. त्यामुळे पक्षाच्या कार्यक्रमांना अनुपस्थित असलेले आमदार बनसोडे वैयक्तिक पातळीवर बैठका- चर्चा आणि प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेताना दिसतात.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा शहरातील एकमेव आमदार आणि अजित पवार यांचा निष्ठावंत कार्यकर्ता अशी आमदार अण्णा बनसोडेंची ओळख आहे. मात्र, महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या काळात बनसोडे राजकीयदृष्ट्या ‘कॉर्नर’ झाले. स्थानिक पातळीवर संघटनात्मक बदल झाले. त्यानंतर बनसोडेंसह काही दिग्गज नेत्यांमध्ये असुरक्षिततेची भावना आहे. यामुळे राष्ट्रवादीत नवे-जुने किंवा लांडे गट, वाघेरे गट, बहल गट, गव्हाणे गट, शिलवंत गट, मिसाळ गट, भोईर गट, काटे गट, कलाटे गट अशी अप्रत्यक्षपणे शकले पडली आहेत.

दरम्यान, गटातटांत विखुरलेल्या स्थानिक पदाधिकाऱ्यांच्याओंजळीने पाणी पिण्यापेक्षा “आपला मतदार संघ भला आणि मी भला” अशा भूमिकेत अण्णा बनसोडे दिसतात.

### ...तर राष्ट्रवादीचे पानिपत निश्चित

वास्तविक, आमदार बनसोडे यांची नाराजी राष्ट्रवादीला परवडणारी नाही. आगामी महापालिका निवडणुकीत पिंपरी विधानसभा मतदार संघातून सुमारे १४ ते १६ नगरसेवक निवडणूक लढवणार आहेत. राष्ट्रवादीचा ‘परफॉर्मन्स’ हा या मतदार संघात केवळ बनसोडेंच्या भूमिकेवर अवलंबून आहे. बनसोडे यांनी बोटचेपी भूमिका घेतल्यास किंवा भाजपात प्रवेश केल्यास केवळ राष्ट्रवादीला फटका बसणार असून, भाजपाला फायदा होणार आहे. त्यामुळे पश्चिम बंगालमध्ये एकाकी लढणाऱ्या ममता बॅनर्जी यांना सहज घेण्याची चूक भाजपाला भोवली, तशी राष्ट्रवादीत एकाकी पडलेल्या अण्णा बनसोडेंना हलक्यात घेणे राष्ट्रवादीला परवडणारे नाही, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. त्यासाठी ‘कारभारी’ आणि विरोधी पक्षनेते अजित पवार जातीने लक्ष घालतील, अशी अपेक्षा राष्ट्रवादीच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

### अजित पवार, जयंत पाटलांच्या कार्यक्रमाला दांडी...

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या पिंपरी विधानसभा मतदार संघातच आगामी महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादीला नाराजीचा फटका बसण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. पिंपरी विधानसभेतील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे आमदार अण्णा बनसोडे हे गेल्या काही दिवसांपासून कमालीचे नाराज दिसत आहेत. पक्षाच्या अनेक कार्यक्रमांमध्ये त्यांची अनुपस्थिती बोचणारी असतानाही वरिष्ठ नेत्यांकडून मात्र समजूत काढण्याचा प्रयत्न होताना दिसत नाही. परिणामी, विरोधी पक्षनेते अजित पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत शहरात गेल्या १५ दिवसांत दोन कार्यक्रम झाले. या दोन्ही कार्यक्रमांना आमदार बनसोडे यांनी ‘दांडी’ मारली. मात्र, महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि नुकतेच महावितरण अधिकाऱ्यांशी वीज समस्येबाबत तत्परते आमदार बनसोडे यांनी बैठक घेतली. त्यामुळे आमदार बनसोडेंच्या मनात चाललेय तरी काय? अशी सवाल उपस्थित होत आहे.

---

# भारताच्या जडणघडणीत महापुरुषांचे योगदान!

### अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ : महात्मा गांधी, लाल बहाद्दूर शास्त्री यांना अभिवादन

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

मोहनदास करमचंद गांधी उर्फ महात्मा गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील अहिंसेच्या मार्गाचा अवलंब करणारे प्रमुख नेते होते तर दिवंगत माजी पंतप्रधान भारतरत्न लाल बहादूर शास्त्री हे स्वातंत्र्यसैनिक आणि मुत्सद्दी राजकीय नेते होते,या दोन्ही महापुरुषांनी भारताच्या जडणघडणीत दिलेले योगदान अभूतपूर्व आहे असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांनी केले.

### महापुरुषांच्या विचारांचा आदर्श सर्वांनी घ्यावा

अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ म्हणाले महात्मा गांधी यांच्या सत्य व अहिंसेच्या विचारांनी केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील नागरिक प्रभावित आहेत. ते नेहमी स्वच्छतेचा आग्रह करायचे, त्यांच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील इंग्रजांविरुद्धचे असहकार आंदोलन आणि भारत छोडो अभियानामुळे महात्मा गांधी हे देशभरातील स्वातंत्र्यसैनिकांचे, देशभक्तांचे आदर्श बनले असे सांगून “जय जवान जय किसान” ही क्रांतिकारी घोषणा करणारे आणि सर्व देशवासीयांचे बळ सेनादलाच्या पाठीशी उभे करणारे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री हे मुत्सद्दी तसेच प्रखर देशभक्त होते या दोन्ही महापुरुषांच्या विचारांचा आदर्श सर्वांनी घ्यावा असेही ते म्हणाले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील महापुरुषांच्या प्रतिमेस जितेंद्र वाघ यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी सहाय्यक आयुक्त राजेश आगळे, माहिती व जनसंपर्क



विभागाचे प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती देशभर सर्वत्र साजरी करण्यात येते.

## संपादकीय

# तेलाचा तळतळाट!

***रशियाकडील तेलाच्या खरेदीवरील बंदीपेक्षा दरनियंत्रण लादण्याचा 'जी ७' समूहाने योजलेला उपाय प्रभावी ठरेल आणि भारतासही लाभाचाच!***

युक्रेन युद्धात रशियास काही प्रमाणात आणि कदाचित तात्पुरतीही माघार घ्यायला लागल्याने पाश्चात्य देशांस चांगलाच हुरूप आलेला दिसतो. तसे होणे तसे रास्तच. रशियाच्या या माघारीमागे अमेरिकेने पुरवलेल्या हत्यारांचा वाटा मोठा. यामुळेही असेल पण अमेरिका आणि त्याचे कच्छपि देश रशियाविरोधात आणखी एक अस्त्र उगारू इच्छितात. ते म्हणजे तेलास्त्र! हे आता दुसऱ्यांदा उगारले जाईल. आधी जगाने रशियन तेलावर बहिष्कार घालावा यासाठी प्रयत्न झाले. ते जमले नाही. खुद्द युरोपनेच तसे करण्यास नकार दिला. कारण युरोपातील अनेक देशांतील चुली रशियन ऊर्जास्रोतांवर पेटतात. तेव्हा रशियन इंधनास नाही म्हणणे युरोपियनांस शक्य नाही. त्यामुळे अमेरिकादी देशांनी तेलास्त्राचा दुसरा भाग पुढे केलेला दिसतो. तो म्हणजे रशियन तेलाच्या किमतींवर नियंत्रण. पहिल्या तेलास्त्रापेक्षा हे दुसरे अस्त्र अधिक प्रभावी ठरण्याची शक्यता दिसते. याचे कारण यामागे 'जी ७' नावाने ओळखला जाणारा बलाढ्य देश समूह असून त्यास संघटनेच्या पातळीवर युरोपचीही मान्यता आहे. म्हणजे अमेरिका, जपान, जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, इटली, कॅनडा आणि युरोपीय संघटना या दुसऱ्या तेलास्त्रामागे असून हे अस्त्र कधी, कसे आणि किती काळ उगारावे याची चर्चा सध्या सुरू आहे. पहिल्या अस्त्रात रशियाकडून होणारी तेलखरेदी सरसकट बंद करणे अनुस्यूत होते. दुसरे अस्त्र रशियावर किमतीचे नियंत्रण घालते. म्हणजे निर्धारित किमतीपेक्षा अधिक दर घेऊन रशिया तेल विकू शकणार नाही. यामागील विचार असा की किंमत नियंत्रण घातल्याने रशियाचे तेल बाजारात येत राहील, तेलटंचाई होणार नाही आणि तरीही नफेखोरी करता न आल्याने तेल विकून रशियाच्या तिजोरीत फार काही पैसा जमा होणार नाही. या अस्त्राच्या बिनचूकपणासाठी वाहतूक, विमा आदी क्षेत्रे यात सहभागी होतील. ही झाली हे तेलास्त्र उगारणाऱ्यांची पार्श्वभूमी. आता हे अस्त्र ज्यावर उगारले जाणार आहे त्या रशियाविषयी. हा देश आज जगातील दुसऱ्या क्रमांकाचा तेल उत्पादक. म्हटल्यास सौदी अरेबिया किंवा अमेरिका यांच्याशी स्पर्धा करू शकेल इतके महाकाय तेलसाठे रशियात आहेत. पण तरीही सौदी अरेबिया वा व्हेनेझुएला आदींप्रमाणे रशिया तेल निर्यातदार देशांच्या संघटनेचा सदस्य नाही. प्रतिदिन जगात वापरल्या जाणाऱ्या तेलातील १०-११ टक्के इतका वाटा रशियाच्या तेलाचा असतो. दररोज दहा कोटी बॅरल्स जगात रिचवले जात असेल तर त्यातील एक कोटभर बॅरल्स रशियातील असतात. तथापि युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून इतके तेल विकणे रशियास शक्य झालेले नाही. त्यात कपात होऊन साधारण ७० लाख बॅरल्स इतके तेल रशिया आंतरराष्ट्रीय बाजारात विकतो. या तेलविक्रीतून रशियाच्या तिजोरीत दर महिन्याला सरासरी सुमारे २००० कोटी डॉलर्स इतके उत्पन्न मिळते.

# मंदीमुळे उत्पन्न घटण्याची आणि गरिबीत वाढ होण्याची भीती







दीड दशकात जग तिसऱ्यांदा मंदीकडे जात आहे का? आजच्या इंग्लंडची स्थिती या प्रश्नाचे उत्तर आहे. ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात डेन्मार्कची गुंतवणूक बँक, सॅक्सो बँकेचे विश्लेषक ख्रिस्तोफर डेंबिक यांनी सांगितले की, इंग्लंडची स्थिती विकसनशील देशासारखी झाली आहे. डेम्बिकच्या मते, "इंग्लंडला विकसनशील देशांत येण्यापासून रोखणारा एकच उपाय शिल्लक आहे आणि ते म्हणजे त्याचे चलन, पौंड. अशांत आर्थिक स्थिती असूनही पाउंड मजबूत आहे. पण गेल्या सोमवारी तो मापही मोडला गेला आणि डॉलरच्या तुलनेत पौंड विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला. डेम्बिककडून कोणतेही नवीन विधान नाही, परंतु आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार एकेकाळी सुरक्षित मानले जाणारे ब्रिटिश पाउंड विकून यूएस डॉलर खरेदी करत आहेत.

ज्या ब्रिटीश साम्राज्याचा सूर्य कधीच मावळत नाही, त्याचे हे आजचे वास्तव आहे. बँक ऑफ इंग्लंडने म्हटले आहे की डिसेंबर तिमाहीत देश मंदीमध्ये प्रवेश करेल. त्यात 2025 पर्यंत नकारात्मक विकास दर म्हणजेच मंदीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. केवळ इंग्लंडच नाही तर युरोपातील अनेक देशांची अर्थव्यवस्था ढासळत चालली आहे. आधी कोरोनाचे संकट, नंतर रशिया-युक्रेन युद्ध आणि आता या दोन्हींमुळे विक्रमी महागाईने जग पुन्हा एकदा मंदीच्या उंबरठ्यावर आले आहे.

2008-09 च्या आर्थिक संकटानंतर असे म्हटले जात होते की, असे संकट आयुष्यात एकदाच येते. पण त्यानंतर कोरोना लॉकडाऊनमुळे निर्माण झालेले आर्थिक संकट आणि आता युद्ध... हे पहिल्यांदाच घडले आहे. म्हणूनच वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने बुधवारी 'चीफ इकॉनॉमिस्ट्स आउटलुक' या ओळींसह प्रसिद्ध केले, "नवीन पिढी प्रथमच इतकी जास्त महागाई पाहत आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अमेरिकेसह अनेक देश व्याजदर वाढवत आहेत, त्यामुळे जागतिक विकासाला धोका निर्माण झाला आहे. लोकांचे खरे उत्पन्न आणि ग्राहकांचा विश्वास सतत कमी होत आहे. अशा परिस्थितीत बेरोजगारी आणि सामाजिक अशांतता वाढू शकते.

बहुतेक तज्ञ मंदीची शक्यता योग्य मानतात. नेड डेव्हिस रिसर्च (NDR) ने मध्यवर्ती बँकांनी व्याजदर वाढवल्यामुळे आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे पुढील वर्षी मंदीचा अंदाज 98.1% आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने जगातील शीर्ष 49 संस्थांच्या मुख्य अर्थशास्त्रज्ञांचे सर्वेक्षण केले, ज्यामध्ये केवळ 14% ने सांगितले की मंदीचा कोणताही धोका नाही. 9% लोकांना याची खूप भीती वाटली आणि 64% लोकांनी खूप सांगितले. यूएससाठी 70% आणि युरोपसाठी 80% अर्थशास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की पुढील एका वर्षात व्याजदर वाढतील, त्यामुळे मंदीचा धोका जास्त आहे.

खरंच, अमेरिका आणि युरोप विक्रमी महागाईशी झुंज देत आहेत. अमेरिकेतील किरकोळ चलनवाढीचा दर या वर्षीच्या जानेवारीपासून सातत्याने ७.५% वर राहिला आहे. जूनमध्ये ते 9.1% पर्यंत पोहोचले, जे 1981 नंतरचे सर्वोच्च आहे. ऑगस्टमध्ये तो 8.3 टक्के होता. युरोझोनमधील महागाई ऑगस्टमध्ये विक्रमी 9.1% वर पोहोचली आहे. ते खाली आणण्यासाठी, यूएस फेडरल रिझर्व्हने 17 मार्च ते 21 सप्टेंबर या कालावधीत पाच वेळा व्याज 3% वाढवले आहे. गेल्या तीन वेळा, प्रत्येक वेळी त्यात 0.75% वाढ झाली. युरोपियन सेंट्रल बँकेने गेल्या महिन्यात 19-राष्ट्रीय गट युरो झोनसाठी व्याजदर 0.75% ने वाढवले आहेत. यापूर्वी जुलैमध्ये त्यात 0.5% वाढ झाली होती. इंग्लंड युरो झोनच्या बाहेर आहे, जेथे ऑक्टोबरमध्ये चलनवाढ 13% ओलांडण्याची अपेक्षा आहे. नैसर्गिक वायूच्या किमती गगनाला भिडण्यापासून सामान्य लोकांचे आणि उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी, इंग्लंडने किंमत मर्यादा निश्चित केली आहे. ऑक्टोबरमध्ये ही मर्यादा 70% पर्यंत वाढवण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर महागाईही सातव्या गगनाला भिडणार आहे. कमी-अधिक प्रमाणात हीच परिस्थिती इतर युरोपीय देशांची आहे.

# रिअल इस्टेटला बूम

**देशात सर्वाधिक रोजगारनिर्मिती करणाऱ्या क्षेत्रांमध्ये बांधकाम क्षेत्राचा समावेश होतो. यंदा जानेवारी ते जून या कालावधीत देशातील प्रमुख आठ शहरांतील सदनिकांची विक्री गेल्या वर्षीच्या तुलनेत ६० टक्क्यांनी वाढली आहे.**

सध्याची सदनिकांची वाढती मागणी पाहता चालू वर्षी आणि पुढील वर्षीही बांधकाम क्षेत्रासाठी सकारात्मक राहणार आहे. देशपातळीवर विविध संस्थांनी जाहीर केलेल्या अहवालातील आकडेवारीनुसार या दाव्याला बळकटी मिळाली आहे. सदनिका खरेदी विक्रीमधील वाढ गेल्या नऊ वर्षांतील सर्वाधिक वाढ असल्याचाबांधकाम व्यावसायिकांचा दावा आहे.

करोनाच्या दोन वर्षांच्या काळात स्थावर मालमत्ता क्षेत्रात व्यवहार मंदावले होते. मात्र जानेवारी ते जून २०२२ या कालावधीत देशात सदनिकांच्या विक्रीचे प्रमाण ६० टक्क्यांनी वाढले आहे. देशातील प्रमुख आठ शहरांमध्ये मिळून १ लाख ५८ हजार ७०५ सदनिकांची विक्री झाली, तर २०२१ मध्ये पहिल्या सहा महिन्यांत ९९ हजार ४१६ सदनिकांची विक्री झाली होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत सदनिका विक्रीतील ही वाढ गेल्या ९ वर्षांतील



सर्वाधिक आहे.

मुंबई, दिल्ली, बेंगळूरु, चेन्नई, पुणे, अहमदाबाद, हैदराबाद आणि कोलकाता या आठ शहरांतील सदनिका विक्रीची आकडेवारी पाहता ही वाढ निदर्शनास येते. देशात सर्वाधिक ४४ हजार २०० सदनिकांची विक्री मुंबईत झाली. त्या खालोखाल दिल्लीत २९ हजार १०१ आणि बेंगळूरुमध्ये २६ हजार ६७७ सदनिका विकल्या गेल्या. तर पुण्यात २१ हजार ७९७ सदनिकांची विक्री झाली. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत सदनिकांच्या विक्रीचे प्रमाण मुंबईत ५५ टक्के आणि पुण्यात २५ टक्के वाढले आहे. प्रमुख आठ शहरांतील सदनिका विक्रीपैकी २८ टक्के सदनिकांची विक्री एकट्या मुंबईत झाली. देशभरात नवे गृहप्रकल्प सादर करण्याचे प्रमाणही गेल्या वर्षीच्या तुलनेत ५६ टक्क्यांनी वाढले. नवे गृहप्रकल्प सादर करण्याचे प्रमाण मुंबई ३२ टक्क्यांनी वाढले, तर पुण्यात नवीन गृहप्रकल्प सादरीकरणात १५ टक्क्यांनी घट झाली. देशभरातील प्रमुख आठ शहरांमध्ये सदनिकांच्या किमती सरासरी ३ ते ९ टक्क्यांनी वाढल्या. त्यात मुंबईत ६ टक्के, बेंगळूरुमध्ये ९ टक्के आणि दिल्लीमध्ये ७ टक्के वाढ झाली. तर पुण्यात ६ टक्के वाढ झाली. २०१५ पासून पहिल्यांदाच देशभरातील सदनिकांच्या किमतीमध्ये वाढ झाली आहे मात्र त्यानंतरही राज्यभरात सदनिका खरेदी विक्रीला गती मिळाली असल्याची वस्तुस्थिती आहे. करोना प्रादुर्भावाच्या आधी रेरा कायदा, वस्तू आणि सेवा कराची अंमलबजावणी यामुळे बांधकाम क्षेत्रात आणि ग्राहकांमध्येही गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती.

## ।। अभंगवाणी ।।



बोलायाचा त्यासीं ।
नको संबंध मानसीं ॥१॥
जया घडली संतनिंदा ।
तुज विसरूनि गोविंदा ॥ध्रु.॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### "तुम्ही मला आता साधू बनवता का?"

।मुंबई। महाईन्यूज।

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे दोन दिवसांच्या उत्तर महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. हा राजकीय दौरा नसल्याचं राज ठाकरे यांनी सांगितलं आहे. मात्र, आगामी नाशिक महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे मनसे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक घेणार आहेत. हा दौरा खासगी असला तरी काही कार्यकर्ते आज राज ठाकरे यांना भेटण्यासाठी आले होते. यावेळी राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना "मला साधू बनवता का?" असा प्रश्न विचारल्याने उपस्थितांमध्ये हशा पिकला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे नाशिकच्या दौऱ्यावर असून त्यांनी आज श्प्तशृंगी गडावर जाऊन देवीचे दर्शन घेतले. त्यापूर्वी निफाडमध्ये असताना काही कार्यकर्त्यांनी त्यांना भगवी शाल आणि त्रिशूळ भेट दिली. यावरून राज ठाकरे यांनी "आता मला साधू बनवता का?" असा मजेशीर प्रश्न केला. राज ठाकरेंच्या या प्रश्नानंतर उपस्थितांमध्ये हशा पिकला होता. राज ठाकरे यांनी नाशिकला येण्यापूर्वी शनिवारी शिर्डी येथे साईबाबांच्या

# मुख्यमंत्री शिंदेंना जीवे मारण्याची धमकी!

## कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत

।मुंबई। महाईन्यूज।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली आहे. या धमकीनंतर मुख्यमंत्र्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. "मला धमक्यांचे अनेकदा फोन आलेले आहेत. या धमक्यांचा माझ्यावर परिणाम होत नाही. मी जनतेतला माणुस आहे. मला जनतेमध्ये जाण्यापासून कोणीही रोखू शकत नाही", असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. धमकीचे मला काही अप्रूप नाही. कोणाला वाटलं तरी ते काहीही करू शकत नाहीत.**



**स्फोट घडवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना जीवे मारण्याचा कट असल्याची माहिती गुप्तचर विभागाला मिळाली आहे. यानुसार पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. या धमकीनंतर शिंदेंच्या ठाण्यातील आणि शासकीय निवासस्थान 'वर्षा'वरील सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या कार्यालयात महिनाभराआधी धमकीचे पत्र आले होते. त्यानंतर धमकीचा फोनदेखील आला होता. पंढरपुरातील आषाढी वारीच्या वेळीही मुख्यमंत्र्यांच्या जीवाला धोका असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर आत्ता पुन्हा मुख्यमंत्र्यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे.**

त्यांनी अशाप्रकारचं धाडस करण्याचा प्रयत्न करू नये, असा सल्ला मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. या धमकीबाबत पोलीस आणि गृह विभागाकडून योग्य खबरदारी घेण्यात येत आहे. कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत, असा विश्वास यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला आहे. नक्षलवाद्यांकडून याआधीही धमक्यांचे फोन आले होते, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. दसरा मेळावा काही दिवसांवर येऊन ठेपला असताना मुख्यमंत्र्यांना मिळालेली धमकी पोलीस यंत्रणेसमोर मोठं आव्हान आहे. शिंदे गटाचा दसरा मेळावा मुंबईतील बीकेसी मैदानावर तर उद्धव ठाकरेंचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवर होणार आहे.

स्फोट घडवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना जीवे मारण्याचा कट असल्याची माहिती गुप्तचर विभागाला मिळाली आहे. यानुसार पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. या धमकीनंतर शिंदेंच्या ठाण्यातील आणि शासकीय निवासस्थान 'वर्षा'वरील सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. दरम्यान,

## "सचिन वाझे हे उद्धव ठाकरेंचे कार्यकर्ते"

**मुंबई : शिंदे गटाचे खासदार प्रतापराव जाधव यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर गंभीर आरोप केला आहे. 'मातोश्री'वर दर महिन्याला १०० खोके पाठवले जात होते, असा गौप्यस्फोट त्यांनी केला आहे. ते बुलढाण्यात 'हिंदू गर्व गर्जना' कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करत होते. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली असून सचिन वाझे हे दर महिन्याला मातोश्रीवर १०० कोटी रुपये पाठवत होते, असं जाधव म्हणाले.**

**प्रतापराव जाधवांच्या टीकेनंतर भारतीय जनता पार्टीचे नेते आशिष शेलार यांनीही उद्धव ठाकरेंवर आरोप केले आहेत. सचिन वाझे हे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते होते, हे कागदोपत्री स्पष्ट झालं आहे, असं आशिष शेलार म्हणाले. प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना शेलारांनी हे विधान केलं आहे.** तुरुंगात आधीच क्षमतेपेक्षा अनेक पट कैदी ठेवण्यात येत आहेत. राज्यातील उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करून प्रकल्पांमधील गुंतवणूक वाढविण्यात येणार आहे. सकल स्थूल उत्पन्नाच्या (जीडीपी) साडेतीन ते चार टक्के किंवा अर्थसंकल्पाच्या २५ टक्के गुंतवणूक प्रकल्पांमध्ये व्हावी, असे प्रयत्न आहेत.

# आदित्य ठाकरेंना मोठा धक्का! वरळीतील शेकडो शिवसैनिकांचा शिंदे गटात प्रवेश

## बालेकिल्ल्यातच कार्यकर्त्यांनी साथ सोडली

।मुंबई। ।महाईन्यूज।



शिवसेनेला मुंबईच्या वरळीत मोठा धक्का बसला आहे. वरळीतील शेकडो शिवसैनिकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शासकीय निवासस्थान 'वर्षा'वर शिंदे गटात प्रवेश केला आहे. कार्यकर्त्यांचा हा प्रवेश युवासेना प्रमुख आदित्य ठाकरेंना मोठा धक्का मानला जात आहे. वरळी विधानसभा मतदारसंघाचे आदित्य ठाकरे आमदार आहेत. बालेकिल्ल्यातच शिवसैनिकांनी साथ सोडल्यानंतर आदित्य ठाकरेंची पुढील वाटचाल बिकट ठरणार आहे. दसरा मेळाव्याच्या काही दिवसांआधीच आदित्य ठाकरे आणि उद्धव ठाकरेंची वरळीतील कार्यकर्त्यांनी साथ सोडली आहे. "आदित्य ठाकरेंना मिळणाऱ्या धक्क्यांची ही सुरुवात आहे. यानंतर त्यांना आणखी मोठमोठे धक्के बसतील", असा इशारा शिंदे गटातील नेते किरण पावसकर यांनी दिला आहे. वरळीत अनेक समस्या आहेत. उद्धव ठाकरे अडीच वर्ष मुख्यमंत्री होते, आदित्य ठाकरे कॅबिनेट मंत्री होते, तरीही हे प्रश्न सुटू शकले नाहीत. त्यामुळे शिवसैनिकांमध्ये संताप होता, असे पावसकर म्हणाले आहेत. हिंदूत्वाची वज्रमुठ उशिरा का असेना आदित्य ठाकरेंना आठवली, असा टोलाही त्यांनी 'टीव्ही ९' या वृत्त संस्थेची बोलताना लगावला.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची वर्षा निवासस्थानी शिक्षक संघटनेच्या सदस्यांनी भेट घेतली आहे. शिक्षण क्षेत्रातील समस्यांबाबत ही भेट झाल्याची माहिती मिळत आहे. ऐतिहासिक दसरा मेळावा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. उद्धव ठाकरे यांचा दसरा मेळावा परंपरेनुसार शिवाजी पार्कवर होणार आहे. तर बीकेसी मैदानावर शिंदे गटाचा मेळावा होणार आहे. उद्धव ठाकरेंच्या मेळाव्यावर मुंबई भाजपाचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी निशाणा साधला आहे. "काँग्रेसच्या भारत जोडोला पेंग्विन सेनेची साथ, दसरा मेळाव्याच्या गर्दीसाठी काँग्रेस देणार हात!" असा आरोप शेलार यांनी केला आहे.

# नांदेड : शेतीपूरक साहित्य दुकान आगीच्या विळख्यात

### 50 लाखांचे नुकसान ; चार तासानंतर आगीवर नियंत्रण

।नांदेड ।महाईन्यूज।



नवा मोंढा येथे शेतीपूरक साहित्य विक्रीच्या दुकानाला शनिवारी मध्यरात्रीनंतर अचानक आग लागून या दुकानातील सुमारे ५० ते ६०लाख रुपयांचे साहित्य जळून खाक झाले. या दुकानाच्या पाठीमागे असलेल्या एका दुकानाला प्रथम आग लागली आणि या आगीचे लोट या दुकानात शिरल्यानंतर आगीचा भडका उडाला. या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्नीशमन दलाच्या जवानांना सुमारे चार तास लागले.

स्वाती विवेक चिद्रावार यांचे विवेक एजन्सीज या नावाचे ठोक व किरकोळ शेतीपूरक साहित्य विक्रीचे नामांकित दुकान आहे. त्या दुकानामध्ये शेतीसाठी उपयुक्त असणारे ठिंबकचे बंडल, स्क्रीन कलर, तुषार पाईप, पीव्हीसी पाईप आणि इतर साहित्य होते. विशेष म्हणजे हे सर्व साहित्य प्लास्टिक स्वरूपात होते. खरीप हंगाम संपल्यानंतर आता रब्बी हंगामाला सुरुवात होत असल्याने चिद्रावार यांनी शेतीसाठी लागणाऱ्या साहित्यांचा मोठा साठा उपलब्ध करून ठेवला होता. या दुकानाची रुंदी ५० तर लांबी ७० फूट असून सात - आठ मीटर उंचीचे टीनशेडचे दुकान आहे. या दुकानाच्या पाठीमागील भागात संगीता सुनील राखे यांचे मंगलम ट्रेडर्स या नावाने प्लास्टिक साहित्य (युज अँड थ्रो) विक्रीचे दुकान आहे. शनिवारी रात्री सर्वप्रथम या दुकानात आग लागली. प्लास्टिकचे साहित्य असल्याने आगीचा लगेच फडका उडाला आणि विवेक एजन्सीच्या पाठीमागून ही आग या दुकानात शिरली.

# जम्मू काश्मीरच्या पुलवामातील पिंगलानामध्ये दहशतवादी हल्ला

## 1 पोलीस शहीद, एक CRPF जवान जखमी

।राजस्थान ।
महाईन्यूज ।वृत्तसंस्था।

**जम्मू काश्मीरमधील पुलवामा येथे पुन्हा एकदा दहशतवादी हल्ला झाला आहे. या हल्ल्यात एक पोलीस जवान शहीद झाला असून तर एक CRPF जवान जखमी झाल्याचं सांगण्यात येत आहे. जम्मू काश्मीर पोलिसांच्या माहितीनुसार, रविवारी पुलवामाच्या पिंगलाना येथे दहशतवाद्यांनी सीआरपीएफ आणि पोलिसांच्या संयुक्त नाका पार्टीवर गोळीबार केला. यावेळी सुरक्षा दलाच्या जवानांनी परिसराला घेराव घातला आहे. ज्यात दहशतवाद्यांचा शोध सुरू आहे.**



### उमर अब्दुल्ला यांनी केले ट्विट

उमर अब्दुल्ला यांनी या दहशतवादी हल्ल्याबद्दल ट्विट करत लिहिले की, "या हल्ल्याचा निषेध करून आज कर्तव्य बजावताना ज्यांनी आपले प्राण दिले त्यांच्या कुटुंबीयांना मी माझ्या संवेदना व्यक्त करतो. मी जखमी सीआरपीएफ जवान लवकरात लवकर बरं व्हावे यासाठी प्रार्थना करतो. यापूर्वी 30 सप्टेंबर रोजी बारामुल्ला येथे सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले होते. काश्मीर झोनचे एडीजीपी विजय कुमार यांनी सांगितले होते की, दोन्ही स्थानिक दहशतवादी प्रतिबंधित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदशी संबंधित होते. याशिवाय शोपियानमध्येही सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांना घेरले होते, मात्र दहशतवादी फरार झाले होते.

जम्मू-काश्मीरमध्ये रविवारी झालेला हा दुसरा दहशतवादी हल्ला आहे. याच्या काही तासांपूर्वी शोपियानमध्ये सुरक्षा दलांची दहशतवाद्यांशी चकमक झाली होती. ज्यात एक दहशतवादी मारला गेला. ही चकमक शोपियानच्या बस्कुचनमध्ये झाली. मारल्या गेलेल्या दहशतवाद्याचे नाव नसीर अहमद भट्ट असे असून तो नौपोरा बास्कुचन येथील रहिवासी आहे. हा दहशतवादी लष्कर-ए-तोय्यबा या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याचे सांगण्यात येत आहे.

जम्मू-काश्मीर पोलिसांचे एडीजीपी म्हणाले की, मारल्या गेलेल्या दहशतवाद्याकडून दारूगोळा, पिस्तूल, एके रायफल्ससह अनेक शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. तो अनेक दहशतवादी गुन्ह्यांमध्ये सामील होता आणि नुकताच तो एका चकमकीतून निसटला होता.

# अमेरिकेत वादळामुळे ३० जणांचा मृत्यू

## यानमुळे फ्लोरिडा, कॅरोलिनात विध्वंस; मृतांची संख्या वाढण्याची भीती

।चार्ल्सटन ।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

अमेरिकेत आलेल्या इयान या शक्तिशाली वादळाने अमेरिकेत फ्लोरिडा, दक्षिण कॅरोलिना येथे मोठा विध्वंस केला. आतापर्यंत आलेल्या विध्वंसकारी वादळांपैकी एक असलेले हे वादळ कमजोर झाले असून, अमेरिकेच्या उत्तरेकडे उत्तर कॅरोलिनाकडे ते जात आहे. या वादळाने पश्चिम क्यूबातही मोठे नुकसान झाले.

या वादळामुळे झालेल्या दुर्घटनांत फ्लोरिडात सुमारे ३० जण मृत्युमुखी पडले आहेत. वादळामुळे वीजपुरवठा खंडित झाल्याने प्राणवायू पुरवठा करणारे यंत्र बंद झाल्याने एका ज्येष्ठ नागरिक दांपत्य मृत्युमुखी पडले. या वादळामुळे झालेल्या मुसळधार पावसात अनेक घरे पाण्याखाली गेली असून, रस्त्यांवर पाणी साचले आहे. एक २२ वर्षीय तरुणी रस्त्यावरील साचलेल्या पाण्याखालील मोठा खड्डा न कळाल्याने त्यात बुडून मृत्युमुखी पडली.

एका ७१ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाच्या डोक्यात छताचा भाग पडल्याने ते मृत्युमुखी पडले. अनेक जण पाण्यात वाहून गेल्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. फ्लोरिडाचे प्रांतपाल रॉन डिसॅन्टिस यांनी सांगितले, की युद्धपातळीवर मदतकार्य आणि पूरग्रस्तांची सुटका केली जात आहे. प्रचंड वित्तहानी झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.



# काँग्रेस नेते, सदस्यांकडून पक्षाध्यक्षपदाच्या शर्यतीत सामील होण्याची विनंती

## मल्लिकार्जुन खरगे यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली माहिती

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज ।वृत्तसंस्था।

काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी पक्षाध्यक्षपदाच्या शर्यतीत सामील होण्याची विनंती केल्याने अध्यक्षपदासाठी निवडणूक लढवत असल्याचे पक्षाचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले आहेत. मल्लिकार्जुन खरगे यांनी रविवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मल्लिकार्जुन खरगे हे सलग नऊ वेळा विधानसभेचे सदस्य होते, दोन वेळा लोकसभेचे खासदार होते आणि आता ते राज्यसभेचे खासदार आहेत.

आज राष्ट्रपिता गांधीजींचा जन्मदिन आणि जय जवान आणि जय किसानचा नारा देणारे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचाही वाढदिवस असल्याने



पत्रकारांशी संवाद साधण्यासाठी आपण हा दिवस निवडल्याचे ते म्हणाले. खरगे पुढे म्हणाले की, मी कर्नाटकात काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष राहिलो आहे. मी 50 वर्षांहून अधिक काळ भाजप आणि आरएसएसच्या विचारधारेविरुद्ध आणि पक्षाच्या तत्त्वासाठी लढत राहिलो. मात्र निवडणूक हरल्यानंतर मला समजले की माझ्या तत्त्वांचा पराभव झाला. आता पुन्हा लढायचे आहे. मी जे काही अंगीकारतो ते मनापासून करतो. मला सर्व ज्येष्ठ नेते, युवा नेते यांचे सहकार्य लाभले.

**महागाई वाढत आहे, श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत आणि गरीब अधिक गरीब होत आहेत, भाजपने यात एकही आश्वासन पाळले नाही. असा आरोप त्यांनी केला. माझ्या सहकाऱ्यांच्या सांगण्यावरून मला निवडणूक लढवण्याची प्रेरणा मिळाली, राहुल, सोनिया आणि प्रियंका यांना निवडणूक लढवायची नाही म्हणून सर्वांनी माझा पाठिंबा आहे. जेव्हा समविचारी लोक एकत्र राहत नाहीत, तेव्हा कोणतीही तीव्र स्पर्धा होऊ शकत नाही. असाही खरगे म्हणाले.**

महागाई वाढत आहे, श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत आणि गरीब अधिक गरीब होत आहेत, भाजपने यात एकही आश्वासन पाळले नाही. असा आरोप त्यांनी केला. माझ्या सहकाऱ्यांच्या सांगण्यावरून मला निवडणूक लढवण्याची प्रेरणा मिळाली, राहुल, सोनिया आणि प्रियंका यांना निवडणूक लढवायची नाही म्हणून सर्वांनी माझा पाठिंबा आहे. जेव्हा समविचारी लोक एकत्र राहत नाहीत, तेव्हा कोणतीही तीव्र स्पर्धा होऊ शकत नाही. असाही खरगे म्हणाले.

खरगे पुढे सांगतात की, सर्वांनी आम्हाला पाठिंबा द्यावा अशी मी विनंती करेन. मला सर्व प्रतिनिधींचे सहकार्य हवे आहे. पक्षाच्या मूळ विचारधारेसाठी लढत राहणार आहे. शशी थरूर सुधारणांच्या कल्पनेबद्दल बोलतात. 9300 प्रतिनिधी ठरवतील, हा घरचा विषय आहे. प्रत्येकजण जे ठरवेल ते होईल. मी नाही आम्ही करणार. जिथे काही उणिवा असतील तिथे काहीतरी चांगलं करण्याचा विचार करूय

भाजप नेहमीच काँग्रेसकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करतो. निवडणुका कुठे होतात? आता गांधी परिवारावर आरोप करत आहेत ज्यांनी हार मानली आहे. सोनिया गांधींना राजकारणात यायचे नव्हते. कधी पंतप्रधान झाल्या किंवा राहुल यांना बनवले? देश आणि पक्षासाठी त्यांचे बलिदान मोठे आहे. राहुल देशासाठी चालत आहेत. त्यांच्याकडून चांगल्या गोष्टी शिकल्यावर मी काय बोलणार? याचा अर्थ असा नाही की, मी 50 वर्षे काहीही शिकलो नाही. मी गांधी परिवाराकडून चांगल्या गोष्टी मागणार आहे. असही खरगे म्हणाले.

मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, सर्वांना एकत्र काम करावे लागेल. आमचे तरुण, राज्याचे नेते म्हणाले की, गांधी घराणे निवडणुकीत नाही, तुम्ही लढा. जनतेचा आणि नेत्यांचा पाठिंबा आहे. आम्ही सर्व उमेदवार आहोत. आता G 23 नाही. पक्ष वाचवायचा आहे, भाजपविरुद्ध लढायचे आहे. मी येथे केवळ दलित नेता म्हणून नाही. तुमच्यात आणि माझ्यात काय फरक आहे, इथे मी काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून लढतोय. निवडणुकीनंतर सर्वजण मिळून निर्णय घेतील. आम्ही दुबळे आहोत ही तुमची

# एका मुलीच्या आत्मसन्मानाची लढाई लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला



मालिका विश्वात सध्या नवेनवे विषय हाताळले जात आहेत. मग स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात असो किंवा समाजातील अनिष्ट प्रथांच्या विरोधात आवाज असो, टीव्हीवरील प्रत्येक वाहिनी वेगळेपण जपत आहे. ग्रामीण भागातील समस्या मालिकेच्या मार्फत शहरी लोकांपर्यंत पोहचत आहेत. ऐतिहासिक, पौराणिक मालिका प्रेक्षकांच्या पसंतीस पडत आहेत. हिंदी वाहिनी स्टार प्लस गेली अनेकवर्ष प्रेक्षकांचे मनोरंजन करत आली आहे. 'फालतू' नावाच्या एका नव्या मालिकेचा प्रोमो नुकताच प्रदर्शित झाला आहे. या मालिकेच्या निर्मात्यांनी याचा प्रोमो सादर केला आहे.

मालिकेच्या प्रोमोमध्ये एका अशा तरुणीच्या जीवनातील समस्यांवर प्रकाश टाकतो, जिच्या कुटुंबानेच सतत तिचे व्यक्तिमत्व डावलले आणि जी कुटुंबाची कोणीच नाही असे समजून वागवले. कठीण काळातही हार न मानता फालतू स्वतःचे व्यक्तिमत्व कसे सिद्ध करते, हे पाहणे औत्सक्याचे ठरेल. या मालिकेतील मुलीची पार्श्वभूमी राजस्थानमधील दाखवण्यात आली आहे. 'फालतू'ची कथा ही त्या प्रत्येक मुलीच्या कथेवर प्रकाश टाकते ज्यांना आपल्याच कुटुंबात नाकारले जाते, दूर लोटले जाते, व अपमानित केले जाते. अशी वागणूक मिळत असून सुद्धा, 'फालतू' आपल्या आत्मविश्वासाच्या बळावर स्वप्रापूर्तीसाठी झुंजते. आज समाजातील प्रत्येक स्तरातील स्त्री स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करताना दिसून आली आहे.

# काजोल बहीण तनिषासह देवीच्या भक्तीत झाली तल्लीन

अभिनेत्री काजोल बहीण तनिषासह देवीच्या भक्तीत झाली तल्लीन, साजरा केला नवरात्रोत्सव

सध्या सर्वत्र नवरात्रोत्सव साजरा केला जात आहे. सिनेविश्वातही हा सण खास पद्धतीने साजरा केला जातो आणि अनेक कलाकार देवीच्या दर्शनासाठी कुठे ना कुठे जातात. नुकतीच बॉलीवूड सुप्रसिद्ध अभिनेत्री काजोल लालबाग येथील दुर्गा देवीचे आशीर्वाद घेण्यासाठी पोहोचली. तिने देवीचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले. काजोलचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. या व्हिडिओवर चाहत्यांनी खूप चांगल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. काजोलचा हा व्हिडिओ व्हायरल विरल भायानीने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर केला आहे. देवीच्या दर्शनाला जाताना काजोलने पिवळ्या रंगाची साडी नसली असून पारंपरिक पद्धतीने ती तिथे वावरताना दिसतेय. यासोबत तिने कॅमेऱ्यासमोर पोजही दिल्या आहेत. काजोलने एकटीनेच देवीचे दर्शन घेतले नाही, मी यावेळी तिच्याबरोबर तिची बहीण अभिनेत्री तनिषा होती. देवीच्या दर्शनाला गेल्यावर या



दोघीही देवीच्या भक्तीत तल्लीन झाल्याचे दिसून आले. काजोलच्या या व्हिडिओला आतापर्यंत हजारो लाईक्स मिळाले असून हा आकडा सातत्याने वाढत आहे. हा व्हिडिओ पाहून चाहते तिच्या साधेपणाचे कौतुक करत आहेत.२०२० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'तान्हाजी: द अनसंग वॉरियर' या चित्रपटात काजोल मोठ्या पडद्यावर शेवटची दिसली होती.

# प्रियांका चोप्राने साधला अमेरिकेच्या उपाध्यक्षा कमला हॅरिस यांच्याशी संवाद

प्रियांका चोप्रा आज जागतिक स्तरावरची लोकप्रिय अभिनेत्री बनली आहे. सोशल मीडियावर सक्रिय राहून ती चाहत्यांना तिच्या आयुष्यात घडणाऱ्या घडामोडींचे अपडेट्स देत असते. सध्या प्रियांका चोप्राच्या नावाची सर्वत्र चर्चा होत आहे. याचे कारण म्हणजे अलीकडेच प्रियांका चोप्राने डेमोक्रॅटिक नॅशनल कमिटीच्या वुमन लीडरशिप फोरम कॉन्फरन्समध्ये अमेरिकेच्या उपाध्यक्षा कमला हॅरिस यांच्याशी संवाद साधला. या मुलाखतीत त्यांनी अनेक मुद्द्यांवर भाष्य केले. हा अनुभव प्रियांकाने चाहत्यांबरोबर शेअर केला आहे. प्रियांका चोप्राने वॉशिंग्टन येथे कमला हॅरिस यांची मुलाखत घेतली. यावेळी प्रियांकाच्या बोलण्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. प्रियांका चोप्राने स्वतःला आणि कमला हॅरिस यांना 'भारताच्या कन्या' असे संबोधून त्यांच्यातील साम्य अधोरेखित केलं. त्यासोबतच प्रियांका आणि कमला हॅरिस यांनी स्त्री साक्षरता आणि स्त्रिया विविध क्षेत्रात मिळवत असलेल्या यशाबद्दल चर्चा केली.

प्रियांकाने पोस्ट शेअर करत म्हटले, "पूर्वी लोकांनी स्त्रिशक्तीला कमी लेखले. स्त्रियांचे बोलणे मनावर घेतले जायचे नाही, तसेच त्यांना गप्प केले जायचे. पण आज आपण सगळ्या स्त्रिया एकत्र येऊ शकतो, जे चुकीचं आहे त्याला सुधारू शकतो." पुढे मतदानाच्या अधिकाराबद्दलही प्रियांका व्यक्त झाली. तिने लिहिले, "मी अमेरिकेत मतदान करू शकत नाही. पण माझा नवरा करू शकतो आणि एक दिवस माझी मुलगीही करेल." यासोबत प्रियांकाचे आणि कमला हॅरिस यांचे स्त्रियांबद्दलच्या विविध महत्वाच्या मुद्द्यांवर संभाषण झाले. आजच्या घडीला स्त्रिया विविध क्षेत्रात करत असलेलं कार्य हे निश्चितच अभिमानास्पद असल्याचं त्या दोघी म्हणाल्या.



# अभिनेता संजय दत्तने गांधी जयंतीच्या निमित्ताने मुन्नाभाई चित्रपटातील 'तो' सीन केला शेअर

बॉलिवूडचा संजू बाबा अर्थात अभिनेता संजय दत्त चर्चेत असतो. नुकताच तो 'शमशेरा' चित्रपटात दिसला होता. गेली अनेकवर्ष तो बॉलिवूडमध्ये कार्यरत आहे. सकारात्मक भूमिका असो किंवा नकारात्मक कोणतीही भूमिका तो उत्तमरीत्या पडद्यावर साकारतो. त्याने आजवर अनेक भूमिका साकारल्या मात्र त्याची लक्षात राहणारी भूमिका म्हणजे 'मुन्नाभाई', या भूमिकेने त्याला नवी ओळख दिली. 'मुन्नाभाई एबीबीएस' हा चित्रपट आजही प्रेक्षक आवर्जून बघतात. याच चित्रपटाचा पुढील भागदेखील प्रदर्शित झाला होता. पहिल्या भागात डॉक्टर बनणारा मुन्नाभाई दुसऱ्या भागात गांधीजींच्या विचारसरणीवर चालतो.

'लगे राहो मुंन्नाभाई' या चित्रपटात मुन्नाभाई या पात्राला महात्मा गांधी दिसत असतात. ते त्याला आपल्या विचारातून समस्येचे निवारण करण्यास सांगत असतात. या चित्रपटातील एक सीन अभिनेता संजय दत्तने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केला आहे. ज्यात



सुरक्षारक्षक मुन्नाच्या कानशिलात लगवतो, त्यावर मुन्नादेखील त्याला त्याच्या पद्धतीत उत्तर देतो. या व्हिडीओला HAPPY GANDHI JAYANTI TO ALL असा कॅप्शन दिला आहे.

'लगे राहो मुंन्नाभाई' या चित्रपटात संजय दत्त बरोबर मराठमोळे अभिनेते दिलीप प्रभावळकरदेखील होते. दिलीप प्रभावळकर यांनी गांधींची भूमिका केली होती. या चित्रपटात मुन्ना गांधीगिरी करताना दिसला आहे. विद्याबालन , बोमन इराणी, वर्षाव वारसी हे अभिनेतेदेखील प्रमुख भूमिकेत दिसले आहेत. या चित्रपटाला अनेक पुरस्कारदेखील मिळाले आहेत. दिलीप प्रभावळकर यांनी साकारलेले गांधी प्रेक्षकांच्या चांगलेच पसंतीस पडले होते.

मुन्नाभाई या चित्रपटाचा तिसरा भाग लवकरच येणार अशी चर्चा आहे. मात्र दिग्दर्शकांनी अद्याप कोणती घोषणा केली नाही. या चित्रपटाचे दिग्दर्शक राजू हिरानी यांनी संजय दत्तबरोबर दोन चित्रपट केले. त्यानंतर राजू यांनी संजय दत्तच्या जीवनावर आधारित एक चित्रपट काढला होता. ज्यात रणबीर कपूरने संजय दत्तची भूमिका साकारली होती.

## शॉर्ट न्यूज »

### इंडोनेशियात फुटबॉल सामन्यावेळी मैदानावर चाहत्यांचा 'राडा'



**।इंडोनेशिया। महाईन्यूज**

इंडोनेशियातून एक धक्कादायक वृत्त समोर आलं आहे. फुटबॉल सामन्यादरम्यान हिंसाचार घडला आहे. या हिंसाचारात १७४ जणांचा मृत्यू झाला असून, १८० च्यावरती लोक गंभीर जखमी झाले आहेत. इंडोनेशियातील पूर्व जावा भागात ही घटना घडली आहे. याबाबत पोलिसांनी माहिती दिली आहे.

रॉयटर्स या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, अरेमा एफसी आणि पर्सेबाया सुराबाय यांच्यादरम्यान सामना रंगला होता. मात्र, सामन्यात पर्सेबाया सुराबाय संघाने अरेमा एफसीवर मात करत ३-२ ने सामना जिंकला. या सामन्यानंतर पराभूत झालेल्या अरेमा एफसी संघाच्या चाहत्यांनी मैदानावर येत गोंधळ घातला. यावेळी नाराज चाहत्यांना हुसकवण्यासाठी पोलिसांनी आश्रू धुराच्या कांड्याचा मारा केला. त्यामुळे मैदानातील चाहत्यांमध्ये धावपळ उडाली आणि चेंगराचेंगरीच्या घटना घडल्या.

# स्मार्ट इंडिया हॅकेथॉन स्पर्धेत पीसीसीओईआरचे घवघवित यश

## दोन्ही संघाचा एआयसीटीईने एक लाख रुपये बक्षिस आणि प्रमाणपत्र देवून गौरव

**पिंपरी । महाईन्यूज ।**

**भारतीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोवेशन सेल व भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राष्ट्रीय स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२२' स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड रिसर्च महाविद्यालयातील (पीसीसीओईआर) दोन संघाने प्रथम क्रमांक मिळवून विजेतेपद पटकावले.**



दोन्ही संघाचा एआयसीटीईने एक लाख रुपये बक्षिस आणि प्रमाणपत्र देवून गौरव केला. नमक्कल तामीळनाडू येथे झालेल्या स्पर्धेत पीसीसीओईआरच्या "सुगम शिक्षा" या संघाने सॉफ्टवेअर एडिशन मध्ये अंतिम फेरीत नेहा भेगडे हिच्या नेतृत्वाखाली अथर्व निंबाळकर, अभिषेक खाचणे, ओम चिमणपुरे, रितिका भोईटे आणि आदित्य बिले यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

तर कोल्हापूर येथे झालेल्या स्पर्धेत "8 बीट" या संघाने सॉफ्टवेअर एडिशन मध्ये अंतिम फेरीत टीम लीडर आगम बोथरा याच्या नेतृत्वाखाली सिद्धी शितोळे, प्रकाश शर्मा, धैर्यशील मेश्राम, अभिजीत जाधव आणि विश्वतेज सरवळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. स्पर्धेचे समन्वयक म्हणून प्रा. अच्युत खरे आणि प्रा. जमीर कोतवाल यांनी काम केले. प्रा. सोनाली लुनावत, प्रा.निलेश कोरडे, अभिजीत देवगिरीकर, संगणक विभाग प्रमुख प्रा. डॉ. अर्चना चौगुले यांनी मार्गदर्शन केले.

# सचिन तेंडूलकरने सलग दुसऱ्यांदा इंडिया लिजेंड्सला बनवले चॅम्पियन

## सहा गडी राखून रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीज केली नावावर



**। नवी दिल्ली। महाईन्यूज ।**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या इंडिया लेजेंड्सने श्रीलंका लिजेंड्सचा ३३ धावांनी पराभव करत रोड सेफ्टी वर्ल्ड सीरिजचे विजेतेपद पटकावले. भारताकडून शतक झळकावताना नमन ओझा सामन्याचा हिरो ठरला. इंडिया लिजेंड्ससमोर या सामन्यात श्रीलंका लिजेड्स संघाचे आव्हान होते. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ६ गड्यांच्या मोबदल्यात १९५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात श्रीलंकन संघाने सर्वबाद १६२ धावा केल्या. ही सलग दुसरी वेळ आहे, जेव्हा भारताने हा चषक जिंकला. पहिल्या सत्रातही भारताने अंतिम फेरीत श्रीलंकेचा पराभव केला होता. सामन्याचा हिरो ठरलेल्या यष्टीरक्षक नमन ओझाने ७१ चेंडूत १५ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने नाबाद १०८ धावांची तुफानी खेळी केली. त्याव्यतिरिक्त विनय कुमार संघासाठी दुसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला. विनयने २१ चेंडूत ३६ धावा केल्या. श्रीलंकेच्या नुवान कुलसेकरा याने तीन षटका टाकून २९ धावा खर्च केल्या आणि सर्वाधिक ३ गडी बाद केले. इसुरू उडान याने चार षटकात ३४ धावांच्या बदल्यात २ गडी बाद केले. शहीद वीर नारायण सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर भारताने दिलेल्या १९६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंका लिजेंड्सची वरची फळी अपेक्षित प्रदर्शन करू शकला नाही.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही